सहकारातून समृध्दीकडे

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

# प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट- क संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती.

सहकार विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांसाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त आहेत. अशा उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी सहकार आयुक्त कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर दि.१०/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

व्यावसायिक चाचणीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांची लघुलेखन व टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी दि.२१/०९/२०२४ व दि.२२/०९/२०२४ रोजी घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेची गुणवत्ता यादी दि.०४/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात होती.

सदर पदांसाठी घेण्यात आलेल्या १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी अशी एकत्रित एकूण २०० गुणांची तात्पुरती गुणवत्ता यादी दि.१२/१२/२०२४ व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचे कार्यालयाकडील दि.१६/१२/२०२४ रोजी शुध्दीपत्रकान्वये निम्नश्रेणी लघुलेखक या पदाची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांपैकी उपरोक्त पदांसाठी निवड करावयाचे उमेदवार व प्रतिक्षा यादीतील उमेदवार याप्रमाणे उमेदवारांची विभागनिहाय **तात्पुरती निवडसूची** सहकार आयुक्त कार्यालयाच्या उक्त अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**या बाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना खालीलप्रमाणे :-**

(१) संबधीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत, त्यांचे विभागामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहाणेबाबत नोंदणीकृत डाक / ई-मेलद्वारे देखील कळविण्यात येईल.

(२) सदरची निवडसूची केवळ **तात्पुरती निवडसूची** असून,कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची विहीत पदाकरिता निवड झाली आहे असे समजण्यात येऊ नये. तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी अंती उमेदवारांची अंतिम निवडसूची प्रसिध्द केली जाईल.

(३) तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीनंतर उमेदवार सदर पदावरील निवडीसाठी अपात्र ठरल्यास गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारास कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येईल.

तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणी पूर्ण झालेनंतर अंतिम निवडसूची प्रसिध्द करणेत येईल.

**स्वाक्षरी/-**

**अपर निबंधक,सहकारी संस्था(प्रशासन)**

**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**दि.२३/१२/२०२४**